NMRDA
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

क्रमांक : का.अभि.(नामप्रविप्रा)/ ४०२५

नागपूर, दिनांक १८/०३/२०२०

प्रति,

श्री. मच्छीन्द्र रामचंद्र कदम व इतर २
रा. ४०२, दया चेंबर्स, अजनी चौक,
वर्धा रोड, नागपूर ४४० ०१५.

विषय :— मौजा गोटाळपांजरी, खसरा क्रमांक ३८/१,२,३, ३९, प.ह.न. ३८, तह. नागपूर (ग्रा.), जि. नागपूर क्षेत्र ८.९७ हे.आर. (८९७००.०० चौ.मी.) पैकी ८.९६७५०१२ हे.आर (८९६७५.०१२ चौ.मी.) जागा निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चा कलम ४४, ४५ अन्वये अभिन्यास मंजूरी बाबत.

संदर्भ :— आपला दिनांक ३०/०१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

विषयांकित प्रकरणातील जागा "निवासी" वापरार्थ अभिन्यास मंजुरीसाठी उपरोक्त संदर्भांकित पत्र या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. शासनाने दिनांक ०५.०१.२०१८ रोजी मंजुर केलेल्या विकास आराखडयाप्रमाणे शासनाने दिनांक २१/०२/२०१९ रोजी मंजुर केलेल्या नागपूर महानगर क्षेत्राच्या विकास योजनेतील सारभूत स्वरुपाचे बदल क्रमांक **EP-168** नुसार उक्त जागा **"निवासी R-4 लगत १८.०० मी. रूंद प्रस्तावित रस्ता"** या उपयोगाने प्रस्तावित आहे. योजनेतील तरतुदीनुसार या जागेत प्रस्तावित वापर अनुज्ञेय आहे. **मा. महानगर आयुक्त**, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी दि. ०९/०३/२०२० रोजी अभिन्यासाला मोजणी कामी तात्पूरती मंजूरी प्रदान केली आहे. सदर प्रकरणी अभिन्यास **मोजणी कामी** मंजुरी व सदर जागेस **"निवासी"** वापराकरिता आखणीची शिफारस खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त **"निवासी "** वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भूखंडाचे विभाजन करू नये.

२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.

३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.

४. सार्वजनिक सोयी व सुविधा करिता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.

५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.

६. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.

३१. विकासकास अंतिम मंजुरीपुर्वी ७/१२ मधील आंबा झाड नोंदीप्रमाणे संबंधितांचा हक्क सोडण्याचा लेख सादर करावा लागेल.

**प्रस्तावित अभिन्यासाची उपअधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामिण) यांचेकडून जागेवर आखणी करून मोजणी करुन घ्यावी. तात्पूरती मंजुर नकाशे आखणी नुसार मेळात असल्यास मुळ 'क' प्रतसह नकाशाच्या चार प्रती जमीनधारक व वास्तुशास्त्रज्ञाचे स्वाक्षरीने या कार्यालयास अंतिम मंजुरीस्तव सादर कराव्यात आणि आखणीची छायाप्रत 'क' प्रत व तात्पूरती मंजुरीचे नकाशासह अभिन्यासात मुलभुत सुविधा पुरविण्याकरीता करावयाचे विकास कामाचे नकाशे सहाय्यक अभियंता (दक्षिण), नामप्रविप्रा यांचे कार्यालयात सादर करावे.**

सहपत्र : अभिन्यास नकाशा

*ख.क्र. ३८/१,२,३,३९ मौजा गोटाळपांजरी, तह. नागपूर (ग्रा.)*

कार्यकारी अभियंता–१
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रतिलिपी –

१) उपअधिक्षक भूमि अभिलेख, नागपूर (ग्रामिण) – उक्त अभिन्यासाची मौक्यावर मोजणी करून आखणी करण्यासाठी. (अभिन्यास नकाशा २ प्रतींत) व आखणी नकाशाची प्रत आखणी झाल्यावर या कार्यालयाला अभिलेखासाठी पाठविण्यात यावी.

२) कार्यकारी अभियंता–२, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस सादर.

३) सहाय्यक अभियंता (दक्षिण), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, हनुमान नगर, क्रिडा चौक, नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत.

४) मुख्य कार्यकारी अभियंता, म्हाडा, सिव्हील लाईन, नागपूर यांना माहितीस सादर.

-स्वा-
कार्यकारी अभियंता–१
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण